पुढारी

# प्राइम फोकस लिमिटेड

PRIME FOCUS
सीआयएन : L92100MH1997PLC108981
नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँकेसमोर, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२, दूरध्वनी : ०२२ - ६७१५ ५००० फॅक्स : ०२२ - ६७१५ ५००१ वेबसाइट : www.primefocus.com ई-मेल : ir.india@primefocus.com

## २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व परोक्ष ई-मतदान/ई-मतदानाची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपन्या कायदा, २०१३ **(कायदा)** च्या लागू तरतुदी व त्याअंतर्गत संस्थापित नियम तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ **(सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता)** विनियमन, २०१५ **(सेबी विनियमन)** सहवाचन कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे जारी परिपत्रके दि. ०८.०४.२०२०, १३.०४.२०२०, ०५.०५.२०२०, १३.०१.२०२१, १४.१२.२०२१ व ०५.०५.२०२२ **(एमसीए परिपत्रके)** तसेच कोव्हिड - १९ महामारीच्या कारणास्तव सेबी **(सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता)** विनियमन, २०१५ च्या विशिष्ट तरतुदींच्या अनुपालनाशी संबंधित अतिरिक्त शिथिलतांसंदर्भात भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ परिपत्रके दि. १३.०५.२०२२ **(सेबी परिपत्रके)** यांच्या अनुपालनांतर्गत एजीएमची सूचना दि. १२.०८.२०२२ **(सूचना)** मध्ये विहित केल्यानुसार विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी प्राइम फोकस लिमिटेड **(कंपनी)** च्या सभासदांची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार, दि. ३०.०९.२०२२ रोजी दु. १२.३० वा. (भा.प्र.वे.)** व्हिडीओ कॉन्फरन्सिंग **(व्हीसी)** वा अदर ऑडिओ व्हीज्युअल मीन्स **(ओएव्हीएम)** यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे. सदर सूचना कंपनीची वेबसाइट www.primefocus.com वर तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड **(सीडीएसएल)**ची वेबसाइट www.evotingindia.com, बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे. व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेस उपस्थित राहणारे सभासद कायद्याचे अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमकरिता गणले जातील.

एजीएमकरिताचे अपेक्षित ठिकाण हे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय अर्थात प्राइम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँकेसमोर, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२ हे समजण्यात यावे.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत ज्या भागधारकांचे ई-मेल पत्ते कंपनी/कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफरएजंट -लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड वा डिपॉझिटरीज यांच्याकडे नोंदवलेले आहेत अशा सभासदांना एजीएमची सूचना तसेच वित्तीय वर्ष २०२१-२२ करिताचा कंपनीचा वार्षिक अहवाल बुधवार, दि. ०७.०९.२०२२ रोजी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यात आला आहे.

कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४४ व सर्वसाधारण सभांवरील सचिवालयीन निकष २ यांच्या अनुपालनांतर्गत **शुक्रवार, दि. २३.०९.२०२२ (निर्धारित अंतिम तारीख)** रोजीनुसार कागदोपत्री वा डीमॅट स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांना सीडीएसएलद्वारे पुरविण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून ए) परोक्ष ई-मतदान व बी) एजीएमदरम्यान ई-मतदान यांच्या माध्यमातून एजीएमच्या सूचनेत विहित सर्व ठरावांवर आपली मते देता येतील व अशा ई-मतदानाद्वारे सदर विषयांवर विचारविनिमय करता येईल.

परोक्ष ई-मतदान कालावधी (अर्थात सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान **प्रणालीचा वापर करून मतदान) सोमवार, दि. २६.०९.२०२२ (स. ९.०० वा. भा.प्र.वे.) सुरू होईल व गुरुवार, दि. २९.०९.२०२२ रोजी सायं.५.०० वा. (भा.प्र.वे.)** संपेल. सदर कालावधीदरम्यान सभासद त्यांची मते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देऊ शकतील. **गुरुवार, दि. २९.०९.२०२२ रोजी सायं.५.०० वा.** पश्चात सीडीएसएलद्वारे परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल. निर्धारित अंतिम तारखेनुसार कागदोपत्री स्वरूपातील वा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांना केवळ परोक्ष ई-मतदान सुविधा किंवा एजीएममध्ये ई-मतदान सुविधा, जी बाब लागू असेल त्यानुसार, प्राप्त करता येईल. निर्धारित अंतिम तारखेस सभासद नसलेल्या व्यक्तींनी सदर सूचना केवळ माहितीसाठी समजावी. सभासदाद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर पुढे त्याला ते बदलता येणार नाही किंवा पुन्हा मत देता येणार नाही.

सभेस उपस्थित असलेल्या ज्या सभासदांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले नसेल ते एजीएममध्ये सीडीएसएलच्या ई-मतदान पोर्टलवर लॉग इन करून आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील. एजीएमच्या आधी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले सभासदही एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सहभाग घेऊ शकतील, परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा मत देता येणार नाही. ठरावावर एकदा मत दिल्यानंतर व निश्चित केल्यानंतर सभासदास नंतर ते बदलता येणार नाही.

एखाद्या व्यक्तीने सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीची सभासद बनली असेल व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्ती helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, जर सदर व्यक्ती यापूर्वीच परोक्ष ई-मतदानाकरिता सीडीएसएलकडे नोंदणीकृत असल्यास सदर व्यक्ती मत देण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल. तुम्ही पासवर्ड विसरला असल्यास www.evotingindia.com वरील Forget User Details/Password या पर्यायाचा वापर करून तो रिसेट करू शकाल.

डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील, कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेल्या तसेच ई-मेल पत्ते नोंदवलेले नसलेल्या सभासदांकरिता परोक्ष ईमतदान तसेच एजीएममध्ये मतदानाचे स्वरूप एजीएम आयोजित करणाऱ्या सूचनेत परोक्ष ई-मतदान वा एजीएमदरम्यान ई-मतदानाकरिताच्या विस्तृत निर्देशांसमवेतदिलेले आहे. जे सभासद व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून एजीएममध्ये उपस्थित असतील व ज्यांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे ठरावावर आपले मत दिलेले नसतील त्यांना, मत देण्यास प्रतिबंध केलेला नसल्यास असे सभासद अध्यक्षांद्वारे घोषणेपश्चात आयोजित करण्यात येत असलेल्या ठरावांच्या चर्चेच्या समाप्तीच्या वेळी एजीएमदरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे अशा ठरावांवर मत देण्यास पात्र असतील.

परोक्ष ई-मतदानासंदर्भात काही प्रश्न/शंका असल्यास तुम्ही www.evotingindia.com वरील e-voting manual पाहू शकता किंवा खालील ठिकाणी संपर्क साधू शकता :

**नाव व पद :** श्री. राकेश दळवी, उप व्यवस्थापक

**पत्ता :** सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, ए विंग, २५ वा मजला, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.

**ई-मेल आयडी :** helpdesk.evoting@cdslindia.com **दूरध्वनी क्र. :** १८००-२२-५५३३.

ई- मतदान प्रक्रिया नि:पक्ष व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कंपनीने श्री. मेहुल रावल, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र. एसीएस १८३००, सीओपी नं. २४१७०) यांची परीनिरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

सभेमध्ये उपस्थित राहून मत देण्यास पात्र सभासद त्याच्या ऐवजी उपस्थित राहून मत देण्यासाठी प्रतिनिधीची नेमणूक करू शकतो. असे प्रतिनिधी हे कंपनीचे सभासद असण्याची आवश्यकता नाही.

अर्थात एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत सदर एजीएम ही व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यामुळे सभासदांद्वारे प्रतिनिधीची नेमणूक करण्यासाठीची सुविधा एजीएमकरिता उपलब्ध नसेल व त्यामुळे सदर सूचनेसमवेत प्रतिनिधित्व फॉर्म व उपस्थिती पत्र जोडलेले नाही.

**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे**
**प्राइम फोकस लिमिटेडकरिता**
सही/-
परिना शाह
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०७/०९/२०२२**